# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींसाठी सेलिब्रिटीही जबाबदार-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- पतंजलीच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी (७ मे) सुनावणी झाली. न्यायालयाने म्हटले- लोकांवर प्रभाव टाकणाऱ्या कोणत्याही उत्पादनाची किंवा सेवेची जाहिरात दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास सेलिब्रिटी आणि सोशल मीडियावर प्रभाव टाकणारे तितकेच जबाबदार आहेत.

आयएमएने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. त्यात म्हटले आहे की पतंजलीने कोविड लसीकरण आणि ॲलोपॅथी विरोधात नकारात्मक प्रचार केला. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठाने ही सुनावणी केली.

न्यायालयाने म्हटले- प्रसारकांना कोणतीही जाहिरात दाखवण्यापूर्वी स्वयंघोषणा फॉर्म भरावा लागेल, असे नमूद करून की जाहिराती नियमांचे पालन करतात. न्यायालयाने सांगितले की टीव्ही प्रसारक ब्रॉडकास्ट सर्व्हिसेस पोर्टलवर घोषणा अपलोड करू शकतात आणि चार आठवड्यांच्या आत प्रिंट मीडियासाठी पोर्टल तयार करण्याचे आदेश दिले.


(वर्ष ६३ वे अंक १२३) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.०८ मे २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# देशातील तिसऱ्या टप्प्यात ६३.७७ टक्के मतदान

## महाराष्ट्रातील ११ जागांसाठी सर्वात कमी ५३.४०टक्के मतदानाची नोंद



नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- मंगळवारी सकाळी ७ वाजल्यापासून १० राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ९३ लोकसभा जागांसाठी मतदान संपन्न झाले. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ६३.७७ टक्के मतदान झाले आहे. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७३.९३टक्के आणि महाराष्ट्रात सर्वात कमी ५३.४० टक्के मतदान झाले.

आज तिसऱ्या टप्प्यात मतदान पार पडलं यामध्ये महाराष्ट्रातील ११ मतदारसंघ, गुजरातमधील २५, उत्तर प्रदेशातील १०, कर्नाटकातील १४, मध्य प्रदेशातील ९, छत्तीसगडमधील ७, बिहारमधील ५, आसाम ४, पश्चिम बंगालमधील ४, गोव्यातील २ आणि दोन केंद्रशासित प्रदेशातील मतदारसंघांचा समावेश होता. यांपैकी देशभरात सर्वाधिक मतदान ७५.०१ आसाममध्ये झालं तर सर्वात कमी ५३.४० टक्के मतदान महाराष्ट्रात झाले.

बिहारमध्ये मतदानादरम्यान पीठासीन अधिकारी आणि होमगार्ड जवानाचा मृत्यू झाला आहे. छत्तीसगडच्या जशपूरमध्ये मतदानासाठी येत असताना एका वृद्ध मतदाराचा मृत्यू झाला. त्याच वेळी, पश्चिम बंगालमध्ये मुर्शिदाबादचे भाजप उमेदवार आणि टीएमसी समर्थकांमध्ये हाणामारी झाली. उत्तर प्रदेशातील संभलमध्ये पोलिसांनी लोकांवर लाठीचार्ज केला. यामध्ये काही जण जखमी झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदाबादमधील निशान उच्च माध्यमिक विद्यालयात मतदान केले. त्यांच्यासोबत गृहमंत्री अमित शहाही उपस्थित होते.

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राज्यातील सर्वाधिक लक्ष्यवेधी असणाऱ्या ११ लोकसभा मतदारसंघासाठी आज मतदान घेण्यात आले. सायंकाळी ५ वाजेपर्यंत फक्त ५३.४० टक्के मतदान झाल्यांच समोर आलं आहे. त्यामध्ये सर्वाधिक कोल्हापूरमध्ये ६३.७१ तर हातकणंगले लोकसभा मतदारसंघात ६२.१८ टक्के मतदान झालं. सर्वात कमी मतदान बारामतीमध्ये झालं असून ४५.६८ टक्के मतदान झाल्याने दोन्ही उमेदवारांची धाकधूक वाढल्याचं दिसत आहे.

राज्यातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ४५.६८ टक्के मतदान झालं. इतर मतदारसंघांच्या तुलेनेत हे मतदान कमी असल्याचं दिसतंय. बारामतीमध्ये यावेळी सुप्रिया सुळे विरूद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होत असून शरद पवार आणि अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

## मतदानासाठी पैसे वाटल्याचा रोहित पवारांचा आरोप

### पीडीसीसी बँक रात्री उशीरापर्यंत उघडी ठेवल्याने आचारसंहिता भंगचा गुन्हा दाखल

पुणे दि.७ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मतदानासाठी पैसे वाटले जात असल्याचं खळबळजनक आरोप केला होता. फक्त आरोपच नव्हे तर त्यांनी पैसे वाटतानाचा व्हिडिओच ट्विट केला होता. यामध्ये पुणे जिल्हा सहकारी बँक अर्थात इअ्ण्ण बँकेतून पैसे वाटप झाल्याचा गंभीर आरोप केला होता.

त्यानंतर याप्रकरणी निवडणूक आयोगाकडं त्यांनी तक्रारही केली होती. त्यांच्या तक्रारीची दखल घेत निवडणूक आयोगानं आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी बँकेवर गुन्हा दाखल केला आहे.

तिसऱ्या टप्प्यात आज बारामती लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडलं. या लोकसभा मतदारसंघात भोर या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. या मतदारसंघांतर्गत वेल्हे तालुक्याचाही समावेश होतो.

याच वेल्हेतील पीडीसीसी बँकेची शाखा काल रात्री उशीरापर्यंत सुरु ठेवण्यात आली होती. उशीरा बँक याचसाठी ठेवण्यात आली होती कारण मतदारांना पैशांचं वाटप करता यावं. याचा व्हिडिओ देखील रोहित पवार यांनी ट्विट केला होता. यामध्ये चार-पाच लोक बँकेत फिरत असल्याचं दिसत आहे.

दरम्यान, रोहित पवारांच्या या ट्विटनंतर बारामतीसह राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं होतं. अजित पवारांनीही यावर प्रतिक्रिया देताना रोहित पवारांना सोशल मीडिया हँडल करण्याचा चांगला अनुभव असल्याचं म्हटलं होतं. त्यामुळंच त्यांनी काहीतरी खोटाटोप करुन जुना व्हिडिओ कालचा असल्याचं दाखवलं असेल असं सांगताना हे खरंच झालं असेल तर त्याची सखोल चौकशी व्हावी अशी मागणीही केली होती.

रात्री उशिरापर्यंत बँक चालू ठेवल्यानं आचारसंहितेचा भंग झाल्याचं सांगत निवडणूक विभागाच्या भरारी पथकानं पीडीसीसी बँकेवर कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. रात्री पीडीसीसी बँकेत ४० ते ५० लोक संशयतरीत्या फिरत असल्याचं सीसीटीव्ही फुटेजमध्ये भरारी पथकाच्या तपासात स्पष्ट झालं आहे. त्यामुळं याप्रकरणी बँक मॅनेजरसह बँकेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मतदार पठ्ठ्याने ईव्हीएम मशीनच पेटवली

सोलापूर दि.७ (प्रतिनिधी)- सोलापूर लोकसभा मतदारसंघातील सांगोला तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. मतदान करण्यासाठी मतदान केंद्रात गेलेल्या एका युवकाने चक्क ईव्हीएम मशीनवर पेट्रोल टाकून ती पेटवून दिल्याने एकच गोंधळ उडाला. त्यानंतर सदर मशीनला लागलेली आग विझविण्यासाठी कर्मचाऱ्यांनी धाव घेतली.

मिळालेल्या माहितीनुसार, सांगोला तालुक्यातील एका मतदान केंद्रावर मतदाराकडून मतदान मशीन पेटवण्याचा प्रयत्न झाला. एक मराठा, लाख मराठा अशा घोषणा देत सदर मतदार युवकाने ईव्हीएम मशीनवर पेट्रोल टाकून पेटवून दिली. त्यामुळे मतदान केंद्रात एकच गोंधळ उडाला. सदर युवकाने घोषणा देत ही मशीनच बोगस असल्याचा आरोप देखील केला.

ईव्हीएम मशीनला लागलेली आग केंद्रातील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी तत्काळ विझवली. बाजूलाच असलेल्या जारमधील पाणी त्यांनी त्यावर ओतून लागलेली आग त्वरीत आटोक्यात आणली. सदर प्रकार करणाऱ्या युवकाला केंद्रावरील पोलिसांनी ताब्यात घेतले. तर त्यावर पुढील कारवाई केली जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

कोल्हापूर लोकसभेसाठी सुरू असणाऱ्या मतदानात एका वृद्ध व्यक्तीचा मतदानाच्या रांगेतच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

कोल्हापूर शहरातील उत्तरेश्वर पेठेतील रमबाई आंबेडकर शाळेतील मतदान केंद्रावर ही घटना घडली. येथे महादेव श्रीपती सुतार (६९) हे मतदानासाठी आले होते. तिथे रांगेत उभे असताना त्यांना भोवळ आली. त्यानंतर ते जागेवरच कोसळले. यावेळी त्यांच्या नातलगांसह राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. पण उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

## वंचितच्या उमेदवार उत्कर्षा रुपवते यांच्या गाडीवर दगडफेक

शिर्डी दि.७ (प्रतिनिधी)- वंचित बहुजन आघाडीच्या शिर्डी लोकसभा मतदारसंघातील उमेदवार उत्कर्षा रूपवते यांच्या गाडीवर सोमवारी रात्री दगडफेक झाली. सुदैवाने या हल्ल्यात उत्कर्षा रूपवते या बचावल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, उत्कर्षा रूपवते या त्यांचा प्रचार दौरा आटोपून परत येत होत्या. रात्री १० वाजता प्रचार सभा आटोपून त्या अकोले तालुक्यातील चितळवेढे गावाजवळ आल्या. यावेळी अज्ञात लोकांनी त्यांच्या गाडीवर दगडफेक करत हल्ला केला. हल्ला करणारे अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले आहेत.

## अयोध्येतील राम मंदिर कॅन्सल करण्याची काँग्रेसची भाषा; पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आरोप

बीड दि.७ (प्रतिनिधी)- माझा मतदार हाच माझा परिवार आहे. मतदारांच्या भविष्यासाठी त्यांच्या मुलांचे भविष्य सुधारण्यासाठी मी निघालो आहे. 'मेरा भारत, मेरा परिवार' असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. इंडिया आघाडीचे सरकार आल्यास ते कलम ३७०, तिहेरी तलाक, किसान सन्मान निधी, रद्द करण्याची भाषा करत आहेत. इतकेच नाही तर अयोध्येतील राम मंदिर देखील ते कॅन्सल करण्याची भाषा करत असल्याचा गंभीर आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. त्यासाठी राहुल गांधी यांनी काँग्रेस नेत्यांची बैठक देखील घेतली होती, असा दावाही त्यांनी केला आहे. बीड लोकसभा मतदार संघातील भाजप उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

सर्वोच्च न्यायालयाने राम मंदिर संदर्भात जो निर्णय दिला आहे, तो निर्णय आल्यानंतर राहुल गांधी यांनी महत्त्वाच्या नेत्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला काँग्रेस सरकार आल्यास बदलणार असल्याची घोषणा राहुल गांधी यांनी केली होती. राजीव गांधी यांनी देखील या आधी असाच सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बदलला होता. त्यामुळे काँग्रेस राम मंदिराचा निर्णय देखील बदलणार असल्याची भाषा करत आहे. राम मंदिर बिनकामाचे असल्याचे काँग्रेसच्या एका मोठ्या नेत्याने सांगितले होते. त्याच नेत्याने भगवान रामाच्या पूजेला पाखंड असल्याचे म्हटले होते. मात्र, इतर धर्मासाठी अशी भाषा बोलण्याची त्यांची हिंमत होत नसल्याचे मोदी म्हणाले. काँग्रेस केवळ तुष्टीकरणासाठी वारंवार प्रभू श्रीरामाचा आणि राम भक्तांचा अपमान करत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे.

२०१४ साली मला मतदारांनी पहिल्यांदा देशाची सेवा करण्याची संधी दिली. त्यावेळी मी देशभरातून गोपीनाथ मुंडे सारखे सहकारी सोबत घेतले होते. मात्र, दरम्यानच्या काळात मला गोपीनाथ मुंडे, सुषमा स्वराज, अरुण जेटली, मनोहर पर्रीकर या सारख्या सहकाऱ्यांना गमवावे लागले, हे माझे दुर्भाग्य असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. माझे दोन्ही हात गेल्यानंतर माझ्यावर काय परिस्थिती आली असेल याचा अंदाज तुम्ही लावू शकता. माझ्यासारख्या व्यक्तीसाठी हा मोठा आघात होता, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणीला उजाळा दिला.

## केजरीवाल यांना दिलासा नाहीच; तुरुंगातील मुक्काम वाढला

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे मद्यधोरण प्रकरणात अटकेत आहेत. त्यांच्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. मात्र कुठलाही दिलासा त्यांना मिळालेला नाही. त्यांच्या न्यायालयीन कोठडीत २० मेपर्यंत वाढ झाली आहे. भारतात लोकसभा निवडणूक सुरु आहे त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर विचार करता येईल असं मत न्यायालयाने गेल्या आठवड्यात व्यक्त केलं होतं. त्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. मात्र न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना कुठलाही दिलासा दिलेला नाही. त्यांच्या न्यायालयीन कोठडीत २० मे पर्यंत वाढ केली आहे. त्यामुळे त्यांचा तुरुंगातला मुक्काम वाढला आहे.

दिल्ली न्यायालयाने हा निर्णय दिलेला असताना अरविंद केजरीवाल यांना अंतरिम दिलासा देण्याबाबतही सर्वोच्च न्यायालयाने निर्णय घेतलेला नाही. अंतरिम जामिनाच्या याचिकेवर कुठलाही निर्णय घेण्यात आलेला नाही. अरविंद केजरीवाल यांनी कथित मद्य घोटाळा प्रकरणात जी अटक त्यांना करण्यात आली त्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती तसंच अंतरिम जामीन मिळावा म्हणून न्यायालयात अर्ज केला होता.

## गुजरातमध्ये शेतकऱ्यांच्या कांद्याची निर्यातबंदी उठवता मात्र महाराष्ट्रात का नाही? - उद्धव ठाकरे

धुळे दि.७ (प्रतिनिधी)- 'भाजपाने आजपर्यंत धुळेकरांचे कोणते प्रश्न सोडवले? सध्या कांद्याची निर्यातबंदी सुरु आहे. केंद्र सरकार गुजरातच्या शेतकऱ्यांची कांद्याची निर्यातबंदी उठवतात. पण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची कांद्याची निर्यातबंदी उठवत नाहीत, म्हणजे हे महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये भेदभाव करत आहेत. मग गेल्यावेळी याच महाराष्ट्राने ४० पेक्षा जास्त खासदार निवडून दिले होते. त्यामुळे मोदी तुम्ही दिल्ली पाहिली. मात्र, यावेळी महाराष्ट्र तुम्हाला दिल्लीपर्यंत पोहोचू देणार नाही. आम्हाला विचारतात की, महाविकास आघाडी किती जागा जिंकणार? आम्ही ४८ जागा लढवत आहोत आणि ४८ जागा जिंकणार', असे उद्धव ठाकरे म्हणाले. ते आज धुळ्यातील महाविकास आघाडीच्या सभेत बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नगरच्या सभेत बोलताना केलेल्या 'एक्सपायरी डेट'च्या टीकेलाही प्रत्युत्तर उद्धव ठाकरे यांनी दिले.

'पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नगरमध्ये बोलताना म्हणाले, ४ जूनला आमची (इंडिया आघाडीची) एक्सपायरी डेट आहे. आहो तुमचा बुरशी आलेला माल लोकांनी पाहिला. तो ४ जूनला आम्ही केराच्या टोपलीत फेकून देणार आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली घटना ही या गोमूत्रधाऱ्यांना आता ओझं व्हायला लागली. त्यामुळे त्यांना ४०० पार खासदार करून संविधान बदलायचं आहे. मात्र, त्या संविधानाचे रक्षण आपल्याला करायचे आहे. या लोकांनी शेतकऱ्यांशी गद्दारी केली आहे', असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला.

शोभाताई बच्छाव या उद्याच्या खासदार आहेत. शोभाताई तुम्ही योग्य वेळी उमेदवारी घेतली आहे. गेली दहा वर्ष ज्यांना तुम्ही निवडून दिलं होतं त्यांच नातं धुळेकरांनी पाहिलं आहे. समोर जे उमेदवार आहेत ते सुरुवातीला आमच्याकडे होते तसे ते गद्दारच आहेत, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी सुभाष भामरेंवर टीका आहे. दोन वेळा खासदार झाल्यानंतर त्यांना धुळे त्यांची खाजगी मालमत्ता वाटायला लागली. हा धुळेकर तुमचा विजय केल्याशिवाय थांबणार नाही, असा विश्वासही उद्धव ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला.

## निवडणूक काळात ७७ लाखांची दारू, गुटखा जप्त

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात येत आहे. निवडणुकी दरम्यान आदर्श आचारसंहिता सुरु असते. या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये. तसेच मतदारांना आमिष किंवा धमकी देणे यासारखे प्रकार घडत असतात. त्यासाठी शस्त्र, अंमली पदार्थ यांची वाहतूक होते. त्यावर अंकुश ठेवण्यासाठी विविध भागात रस्त्यावर वाहनांची तपासणी केली जाते. याबाबत १६ मार्च ते आतापर्यंतच्या जवळपास दोन महिन्यांत अनेक कारवाया झाल्या. या कारवाईमध्ये पथकाने शहर व ग्रामीण भागातून २७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात शहर हद्दीत सर्वाधिक ४० लाख ८० हजार ७५९ रुपयांचा २ हजार ०३७ किलो गुटखा जप्त करण्यात आला आहे. ग्रामीणमध्ये १२ लाख २० हजार ६२१ रुपयांचा २६४ किलो गुटख्यावर कारवाई करण्यात आली. दारूच्या बाबतीत ग्रामीण भागात सर्वाधिक १५ लाख ३७ हजार १०५ किंमतीची ९ हजार ९०७ लिटर तर शहर हद्दीत ९ लाख ९ हजार ३९७ रुपये किंमतीची २ हजार १३९ लिटर दारूवर जप्त करण्यात आली. विशेष म्हणजे शहर हद्दीत १६ हजारांचे ८९५ ग्रॅम ड्रग्स देखील जप्त करण्यात आले आहे.

## बारामतीची लढाई महाराष्ट्राच्या अस्मितेची, संजय राऊतांचा घणाघात



मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- एका गृहिणीला अजित पवार यांनी बळीचा बकरा बनवले. मला सुनेत्रा पवार यांची दया येते असा घणाघात ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. आज प्रसार माध्यमांशी बोलताना मतदानावरून त्यांनी भाजपवर हल्ला चढवला आहे. नारायण राणे हे देखील पराभवाचा चौकार मारतील असे विधान त्यांनी आज केले आहे.

बारामतीच्या लढतीबाबत बोलतांना राऊतांनी टीकास्त्र डागले आहे. ते म्हणाले, बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे यांचा विक्रमी मताधिक्याने विजय होणार आहे. मला सुनेत्रा पवार यांची दया येते. त्यांचे पतीराज अजित पवार यांनी सुनेत्रा पवार यांना बळीचा बकरा बनवले आहे. बारामतीची लढाई ही महाराष्ट्राच्या अस्मितेची आणि स्वाभिमानाची लढाई आहे, असे राऊत म्हणाले.

पुढे राऊत म्हणाले, बारामतीमध्ये शरद पवार आणि त्यांच्या कुटुंबाचा पराभव करुन मोदी आणि शाहांना दाखवून द्यायचं आहे की, आम्ही गुजरातच्या व्यापाऱ्यांनी पैशाच्या ताकदीवर आणि तपास यंत्रणांच्या मदतीने महाराष्ट्राच्या अस्मितेचा (पान ४ वर)

## काँग्रेस-भाजप-शिवसेना प्रवास करत राजेंद्र गावित पुन्हा भाजपमध्ये दाखल

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- पालघर लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे खासदार राजेंद्र गावित यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये त्यांचा पक्षप्रवेश पार पडला. पालघर लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार असलेले राजेंद्र गावित यांना यावेळी शिवसेनेने उमेदवारी नाकारली होती. यानंतर त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. मात्र, राजेंद्र गावित यांना विचारूनच आपण उमेदवार बदलला असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राजेंद्र गावित दिल्लीपेक्षा महाराष्ट्रामध्ये चांगले काम करू शकतात. त्यामुळे त्यांना महाराष्ट्रातच राहावे, अशी आम्ही विनंती केली होती. त्यानुसार राजेंद्र गावित आता महाराष्ट्रात चांगले काम करतील, असा विश्वास देखील (पान ४ वर)

## ईव्हीएमची पूजा केल्याप्रकणी रुपाली चाकणकरांविरोधात गुन्हा दाखल




पुणे दि.७ (प्रतिनिधी)- राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी मतदानापूर्वी ईव्हीएम मशीनची पुजा केल्याने त्या वादात भोवऱ्यात सापडल्या आहेत. त्यांच्या या कृतीची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू असून विरोधकांकडून त्यांना लक्ष्य करण्यात येत आहे. एवढंच नाही, तर पुण्यातील सिंहगड पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघात आज मतदान पार पडले. यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या आरतीचं ताट घेऊन मतदान केंद्रावर पोहोचल्या होत्या. त्यांनी थेट ईव्हीएम मशीनची पूजा केली. त्यानंतर मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांनी त्यांना रोखत जाब विचारला. तसेच त्यांच्या विरोधात तक्रार नोंदवली.

# मानवतावादी विचारवंत रवींद्रनाथ टागोर

रवींद्रनाथ टागोर यांची ८ मे जयंती त्यांचे शैक्षणिक, वैज्ञानिक विचार, त्यांची देशभक्ती आणि मानवतावाद आजच्या पिढीला प्रेरित करणारा आहे. ८ मे, साहित्य, संगीत, कला यांचे अद्भुत मिलाफ असलेल्या गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांची जयंती! आधुनिक भारतातील एक उत्कृष्ट सर्जनशील कलाकार, तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ ते बंगाली कवी गीतकार, संगीतकार, नाटककार, चित्रकार, आपल्या भारताचे 'जनगणमन' राष्ट्रगीत लिहिणारे, 'गीतांजली' काव्यसंग्रहाला मिळालेला पहिला नोबेल पुरस्कार, पाश्चिमात्य जगाला भारतीय बुद्धीची झलक दाखविणारे, रवींद्रनाथांचे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व!

ठाकूर परिवारातील रवींद्रनाथ हे चौदावे अपत्य. (८ मे १८६१) रवींद्रनाथांनी शालेय शिक्षण टाळले. कराटे-जिम्नॅस्टिक, पोहण्याच्या बरोबर रवींद्रनाथांच्या विकासात विद्वान, व्यासंगी वडीलबंधू ज्योतींद्रनाथाचे स्थान मोठे आहे. टागोर कुटुंबाची जोराशंको वाडी म्हणजे संस्कार शाळाच! लहान वयातच इंग्लिश-युरोपिअन-संस्कृत साहित्याच्या सुसंस्काराबरोबरच पुरुषवर्गाच्या हातात लेखणी-कुंचला-वाद्य काहीतरी असायला हवे, हा कुळाचार होता. कलेकडे कधी शौक/चैन/उपजीविकेचे साधन म्हणून पहिले नाही. विलास आणि विकास यातला फरक समजत होते.

तीन व्याख्याने' या पुलंच्या पुस्तकाचा आणि इतरत्र वाचनाचा आधार घेतला. वयाच्या ११व्या वर्षीच देवेंद्रनाथांनी रवींद्रला बरोबर घेऊन अनेक महिने उत्तर हिंदुस्थानात फिरले. प्रवासात पितापुत्रापेक्षा गुरू-शिष्य नात्याने रवींद्र इतिहास, विज्ञान खगोलचे ज्ञान मिळवत होते. चार भिंतीतून मुक्त झाल्यावर शिक्षण आनंदमय होते, ही अनुभूती मिळाली. याच ११/१२व्या वर्षी दरोडेखोरांच्या वस्तीत निसर्गाला सोबत घेऊन शाळा काढायचे रवींद्रने ठरविले. रवींद्रनाथांनी कायद्याचा अभ्यास लंडनमध्ये करून बॅरिस्टरसाठी इंग्लंडला गेले; परंतु पदवी न घेताच भारतात आले.

रवींद्रनाथांनी वयाच्या ८ व्या वर्षी भानुसिंह नावाने कविता लिहिली. नंतर १२-१६-१८-२० वयात 'मॅकबेथ'चे बंगाली रूपांतर-वल्मिकी प्रतिभा हे गीतनाट्य, लहान मुलांसाठी प्रेरणादायी लघुकथा, २०००च्या वर गाणी रचून त्यांना चाली लावल्या, ५०च्या वर नाटके लिहिली, हे सारे लेखन स्वतःला उत्तम इंग्लिश येत असूनही बंगालीतच लिहिले. जगातील दर्जेदार साहित्य देशी भाषेत यावे, म्हणून अनुवाद केला. वयाच्या साठीनंतर हजारात रंगविलेल्या कॅनव्हासची रंगसंगती पाहता, पॅरिसमधील समीक्षक अवाक् झाले होते. कलेत जे जे केले, ते विलक्षण उत्कटतेने, त्याची कळकळ जाणवते. डझनभर देशांचा दौरा केला. सर्वांशी त्यांचा संवाद होता.

रवींद्रनाथांची असामान्य प्रतिभा ओळखूनही वडिलांनी कष्टमय जीवन जाणण्यासाठी, प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाचा अनुभव दिला. त्यामुळे शहर आणि खेडे यातील अभेद्य भिंत लक्षात आली. युरोपियन ज्ञानापेक्षा इंग्रजीचा पोपटपणा लक्षात आला. इंग्रजी भाषेमुळे शहरात बंगाली भाषेविषयी तिरस्कार निर्माण झालेला पाहताच आपली प्रतिभा शिक्षणासाठी/शांतिनिकेतनसाठी खर्च करायची ठरविले. शांतिनिकेतनसाठी स्वतःचा संसार गुंडाळून सारे पैसे, पत्नी मृणालिनीदेवीने दिलेले दागिनेही विकले.

शिकायला येणारी मुले मनानी मुक्त कशी होतील हे पाहा. दडपण आणि विकास संभवत नाही.□ मुलांच्या कानावर जी भाषा सतत पडते, त्या भाषेतून शिकवा. शिकविण्याच्या पद्धतीला चौकट करू नका. निसर्गाशी नातं जोडा, मूल जिथं वाढतं, त्या वातावरणात मुलांच्या शरीराचं, मनाचं पोषण होत. शिक्षणात ग्रंथाइतकेच हातांनी काहीतरी करायचे याला महत्त्व आहे. संगीत-नृत्य-नाट्य ही शिक्षणाची अविभाज्य अंगे असून मुलांचे हात चित्रशिल्पाच्या निर्मितीत गुंतवा. रवींद्रनाथांच्या जीवनात नवी निर्मिती घडवून आणणाऱ्या कृतीला स्थान होतं. प्रतिकृतीला किंवा अनुकरणाला नव्हतं. शांतिनिकेतन, विज्ञान संशोधनाच्या प्रयोगशाळा सुरू केल्या ते श्रीनिकेतन; सारं विश्व एका घरट्यासारखं व्हावं यासाठी विश्वभारती विद्यापीठाची स्थापना करून पारंपरिक शिक्षणाला आवाहन दिले.

व्यापाराच्या निमित्ताने ठाकूर कुटुंबाचा इंग्रजांशी तीन पिढ्यांचा संबंध होता. इंग्रजांनीच ठाकूरचे टागोर केले. या कुटुंबाने युरोपियन विद्या घेतली, पण त्यांची संस्कृती स्वीकारली नाही. भारतीयच संस्कृती, तत्त्वज्ञान, कला जोपासली. प्रिन्स द्वारकानाथांनी (आजोबा) त्या काळी मेडिकल कॉलेजला ४ लाखांची देणगी दिली होती. त्याहीपुढे हिंदू विद्यार्थी अभ्यासासाठी प्रेतं फाडायला घाबरतात, हे कळल्यावर स्वतः डिसेक्शनच्या तासाला विद्यार्थ्यांना धीर देण्यासाठी उभे राहत. शिवाशिवीच्या सनातनी विरोधाला फोडून काढले.

रवींद्रनाथ सामाजिक बांधिलकी मानणारे कलावंत होते. 'मुक्ती' हा रवींद्रनाथांच्या सर्वच नाटकांचा मध्यवर्ती विचार. अनिष्ट प्रवृत्ती/रीतीपासून मुक्ती. त्या काळात त्यांच्या कुटुंबातल्या मुलींना नाटकात काम करायला, गाणं म्हणायला उभं करणं हेच मुक्ती चळवळीतलं एक पाऊल होतं. सौंदर्य पाहू शकणारा मनुष्य घडविणे म्हणजेच माणूस घडविणे हा त्यांचा कवी धर्म होता. वैयक्तिक जीवनातलं दुःख त्यांच्या साहित्यात कधीच प्रकट झाले नाही. देशापुढल्या अनेक प्रश्नावर त्यांचे लेख/भाषणे गाजली होती. १९१९ मध्ये जालियन बाग हत्याकांडानंतर रवींद्रनाथांनी जॉर्ज पंचमकडून मिळालेली 'सर' ही पदवी परत केली. देशबांधवांना जागृत करताना त्यांनी भाकडकथा किंवा आंधळ्या पूर्वज पूजेचा कधीच आधार घेतला नाही.

राष्ट्रवाद आणि मानवतावाद यात रवींद्रनाथ मानवतावादाला महत्त्व देत होते. मानवतावाद त्यांच्या अनेक कलाकृतींमधून दिसून येतो. 'गोरा' या सर्वोत्कृष्ट रचनेत एका इंग्रज जोडप्याची मुले अनाथ असल्याने हिंदू कुटुंबात वाढतात. आपण ख्रिश्चन आहोत हे वास्तव कळताच त्यांच्या विचारात मोठा बदल होतो, ते फक्त मानवी संबंध महत्त्वाचा मानू लागतात. विश्व कवी होण्याची क्षमता रवींद्रनाथांमध्ये होती. कवितेतील मानवतावादाने त्यांना जगभरात मान्यता मिळवून दिली. गुरुदेव म्हणतात, मानवता माझा आश्रय आहे. रवींद्रनाथ हे कॉस्मोपॉलिट्यनिझमचे प्रखर पुरस्कर्ते होते. मानवतावाद व स्वातंत्र्य या दोन मूलभूत घटकांमुळे त्यांनी राष्ट्रवादापेक्षा आंतरराष्ट्रीय वादाचा जोरदार पुरस्कार केला होता. रवींद्रनाथांना पाहिल्याने, ऐकल्याने, अनुभवल्याने

**आपली एकूण शक्तीच नव्हे, तर क्षेत्रही विस्तारते. रवींद्रनाथ आपल्याला धीर देतात, आनंद द्विगुणित करतात, अनुभव अधिक समृद्ध करतात, निसर्गातल्या एखाद्या दृश्याची परिणामकारकता वाढवतात, रंगालाही सुगंध देतात. अशा मानवतावादी विचारवंत रवींद्रनाथ टागोर यांना विनम्र अभिवादन!**

# मतदान जनजागृती काळाची गरज

**दिनांक** २० एप्रिल, १९३८ रोजी इस्लामपूर येथे केलेल्या भाषणात भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, निवडणुकीच्या वेळी कोणी खोट्या थापा किंवा आमिष दाखविलं तर त्याला तुम्ही भुलू नका. या वाक्याचा आशय १८व्या लोकसभेच्या उमेदवाराला मतदान करताना मतदार राजाने समजून घ्यावा. कारण बाबासाहेबांनी त्यावेळी मतदार राजाला सांगितले होते की, तुमच्या मताची किंमत मीठ-मिरची इतकी समजू नका. त्यातील सामर्थ्य ज्या दिवशी तुम्हाला कळेल, तेव्हा मत विकत घेऊ पाहणाऱ्यांइतके कंगाल कोणीच नसेल.

तेव्हा प्रत्येक मतदार राजाला भारतीय राज्यघटनेने मतदान करण्याचा जो अमूल्य अधिकार दिलेला आहे तो निर्भीडपणे कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान करीन असा संकल्प केला पाहिजे. तसेच, भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या स्वातंत्र्यानंतर भारताला सार्वत्रिक प्रौढ मताधिकार मिळावा यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मतदान हे नागरिकत्वासाठी आवश्यक आहे आणि ऐतिहासिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी मतदान हे राजकीय शिक्षणाचे साधन आहे हा बाबासाहेबांचा युक्तिवाद भारताच्या मतदानाच्या हक्कासाठी महत्त्वाचा आहे.

भारत देशात १८व्या लोकसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ अनुसार लोकसभेची तरतूद केली असून देशात ५४३ मतदारसंघ आहेत. आपल्या महाराष्ट्र राज्यात ४८ मतदारसंघांत पाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यापैकी १९ व २६ एप्रिल रोजी मतदान झालेले आहे. आता ७ मे रोजी रत्नागिरी-सिंधुदुर्गसह ११ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. त्यानंतर १३ मे व शेवटी २० मे रोजी मतदान होईल. त्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान जनजागृती केली जात आहे; परंतु आतापर्यंत महाराष्ट्र राज्यात दोन टप्प्यांत मतदान झालेले आहे. मात्र एकाही मतदार संघात १०० टक्के मतदान झालेले नाही, अशी आकडेवारी सांगते.

पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रात अनुक्रमे रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली चिमूर आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांत सरासरी ५४.८५ टक्के मतदान झाले. यात सर्वात जास्त मतदान गडचिरोली, चिमूर मतदारसंघामध्ये ६४.९५ टक्के झाले, तर सर्वात कमी मतदान नागपूर मतदारसंघामध्ये ४७.९१ टक्के झाले.

राज्यातील मतदानाच्या दुसऱ्या टप्प्याचा विचार करता अनुक्रमे बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या मतदारसंघांत सरासरी ५३.७१ टक्के मतदान झाले. यात सर्वात जास्त मतदान वर्धा मतदारसंघात ५६.६६ टक्के झाले असून सर्वात कमी मतदान नांदेड मतदारसंघात ५३.५३ टक्के झाले आहे. असे का? याचे उत्तर शोधत बसण्यापेक्षा पुढील मतदारसंघात मतदारांच्या मतांचा टक्का कसा वाढू शकतो याचा विचार होणे आवश्यक आहे. यासाठी मतदान जनजागृती एक काळाची गरज आहे.

सध्या सत्ताधारी व विरोधक जीवाचे रान करून कडक उन्हातान्हात लोकसभेच्या प्रचाराला लागले आहेत. सत्ताधारी आपण विकास कसा केला आणि पुढे कसा करणार आहोत याचा प्रचार करीत आहेत, तर विरोधक आपल्याला निवडून दिल्यास आपण विकास कसा साधू शकतो हे विकासाचे नवीन मॉडेल मतदारांना सांगत आहेत. याचे उत्तर ४ जून रोजी मिळेल. काही ठिकाणी 'माझे मत माझे भविष्य' व 'एका मताचे सामर्थ्य' अशा विविध स्पर्धा आयोजित करून मतदार राजाला जागृत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामध्ये गीत-गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा, व्हीडिओ मेकिंग स्पर्धा, भित्तीचित्र स्पर्धा, घोष वाक्य स्पर्धा, सायकल रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. मात्र मतदार राजा खुल्या मनाने मतदान करायला जात नाही हे राज्यातील दोन टप्प्यांत झालेल्या मतदानाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

मतदान आपला अधिकार आणि आपली जबाबदारी आहे याची जाणीव मतदार राजाला करून द्यावी. आपल्या कुटुंबातील १८ वर्षांवरील मतदार झालेल्या किंवा परिसरातील नागरिकांना मतदान करण्यासाठी जागृत करावे. ते सुद्धा आपल्या मतदारसंघात केव्हा मतदान आहे त्याची तारीख व वेळ सांगावी. त्याचबरोबर मतदान करताना मतदार ओळखपत्र न विसरता घेऊन जावे. जर मतदान ओळखपत्र नसेल तरी मतदार मतदान करू शकतात. त्यासाठी पासपोर्ट, वाहन चालक परवाना, फोटो असलेले कर्मचारी ओळखपत्र, छायाचित्र असलेले बँकांचे/टपाल कार्यालयाचे पासबुक, पॅनकार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीद्वारे दिलेले स्मार्टकार्ड, कामगार मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा स्मार्टकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, छायाचित्र असलेले निवृत्तिवेतन दस्तावेज, खासदार/आमदार/विधान परिषद सदस्य यांना दिलेले ओळखपत्र आणि आधारकार्ड यापैकी एक ओळखपत्र असल्यास मतदान करू शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचे नाव मतदान यादीत असायला हवे.

आजही काही गावांमध्ये मतदानावर बहिष्कार घातला जातो हे पाहायला मिळते. त्यासाठी त्या गावच्या समस्या कोणत्या आहेत त्या जाणून योग्य तोडगा प्रशासनाला काढता आला पाहिजे. त्या आधी त्या गावाला निवडणुकीवर बहिष्कार घालण्याची वेळ का आली? याचे उत्तर शोधावे लागेल. त्यासाठी नि:पक्षपातीपणे प्रशासनाला काम करावे लागेल.

तेव्हा मी मतदार आहे, तेव्हा मतदान करून योग्य उमेदवार निवडण्याचा माझा फक्त अधिकार नसून ते माझे राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी आहे, असे प्रत्येक मतदारसंघांतील मतदाराला मतदान करण्यास प्रोत्साहित करावे. तरच मतदानाची टक्केवारी वाढू शकेल. तेव्हा मतदाराने निर्भयपणे मतदान करण्याचा निश्चय करावा. त्याचप्रमाणे इतरांना सुद्धा आपल्या देशातील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन करावे, तर खऱ्या अर्थाने मतदान जनजागृती होऊन मतदार राजा आनंदाने मतदान करेल. त्यासाठी भारतीय निवडणूक आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी केली तरी गावातील विकासकामे होणे आवश्यक आहे.

**- रवींद्र तांबे**

# टागोरांचे भावविश्व संपन्न करणाऱ्या दोन स्त्रिया

**( आज महान कवी, थोर तत्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. त्यानिमित्ताने माझ्या आनंदाच्या गावा जावे या पुस्तकातून साभार घेतलेला लेख. )**



**रवींद्रनाथ** टागोर म्हटले की समोर येते ती पांढरी शुभ्र दाढी असलेली भव्य चेहऱ्याची व्यक्ती. त्यांनी लिहिलेले ' जनगणमन 'आठवते. टागोर म्हटले की त्यांच्या ' गीतांजलीला ' मिळालेला नोबेल पुरस्कार आठवतो. टागोर म्हटले की त्यांचे शांतिनिकेतन आठवते.टागोर हे महान गीतकार आणि संगीतकार. त्यांनी इंग्रज सरकारला'सर 'ही पदवी परत केल्याचे आठवते. आणि आठवतात अशाच साऱ्या अनेक गोष्टी. बंगाली माणसाच्या घराघरात आणि मनात मानाचे स्थान असलेले हे व्यक्तिमत्व. पण त्यांच्या तरुणपणातील एक अधुरी प्रेमकहाणी आपल्याला फारशी माहिती नसते. आणि तिचा संबंध आपल्या महाराष्ट्राशी आणि मराठी मुलीशी आहे.

आत्माराम पांडुरंग तर्खडकर किंवा तर्खड हे त्या काळातील मुंबईतील प्रसिद्ध डॉक्टर आणि समाजसुधारक. त्यांच्यावर बंगालमधील केशवचंद्र सेन यांचा प्रभाव होता. त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन तर्खडकरांनी मुंबईत प्रार्थना समाजाची स्थापना केली. या स्थापनेच्या वेळी त्यांचा उद्देश होता, तो म्हणजे समाजातील जातीभेद दूर करणे, मुलींना शिक्षणासाठी उत्तेजन देणे, बालविवाह रोखणे आणि विधवा पुनर्विवाहास उत्तेजन देणे. तर्खड कुटुंबीय हे उच्चशिक्षित होते. देशविदेशातील अनेक विद्वान आणि थोर व्यक्तींशी त्यांचा संबंध होता. टागोरांना जेव्हा पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवायचे ठरले तेव्हा त्यांना मुंबईत राहत असलेल्या या तर्खडकर कुटुंबात पाठवण्यात आले. त्यांना इकडे पाठवण्यात त्यांचे थोरले बंधू सत्येंद्रनाथ यांची प्रमुख भूमिका होती. कारण सत्येंद्रनाथ आणि आत्माराम तर्खडकर यांचे संबंध. इंग्लंडला जाण्यापूर्वी इंग्रजी बोलणे आणि तेथील रीतिरिवाज शिकण्यासाठी या तर्खड कुटुंबात राहण्याचा त्यांना उपयोग होईल असे सत्येंद्रनाथांना वाटले.

आणि रवींद्रनाथ मुंबईला या तर्खड कुटुंबात दाखल झाले. आत्माराम पांडुरंग यांची दुसरी मुलगी अन्नपूर्णा उर्फ अना ही त्या वेळी नुकतीच इंग्लंडमधून परतली होती. तिचे वय साधारण वीस वर्षांचे. आणि रवींद्रनाथ हा तरुण बंगाली तरुण अवघा १७ वर्षांचा. अना त्यांना इंग्रजी आणि इंग्रजी शिष्टाचार शिकवू लागली. हा देखणा तरुण बंगाली मुलगा तिला आवडला. आणि नकळत ती त्यांच्या प्रेमात पडली. रवींद्रांवर पण तिच्या प्रेमाने जादू केली होती. रवींद्रनाथांनी तिचे नाव नलिनी ठेवले. आणि नलिनी ही त्यांची काव्यप्रेरणा ठरली. त्यांच्या अनेक कविता तिच्यावरच्या प्रेमातून स्फूर्ती घेऊन जन्माला आल्या आहेत. पुढे दोन महिन्यांनी टागोर इंग्लंडमध्ये गेले.

पण त्यांची आणि नलिनीची ही प्रेमकहाणी फुलली नाही. नलिनी उर्फ अनाने नंतर बडोदा येथील कॉलेजमध्ये व्हाईस प्रिन्सिपॉल असलेले हॅराल्ड लिट्लहेड यांच्याशी विवाह केला. आणि पुढे ते दोघे इंग्लंडमधील एडिंबर्ग येथे स्थायिक झाले. पण आजारामुळे अना जास्त काळ जगली नाही. वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. असे म्हणतात की आत्माराम पांडुरंग म्हणजे तिच्या वडिलांच्या मनात तिचा विवाह रवींद्रनाथांशी करून द्यावा असे होते. पण रवींद्रनाथांचे थोरले बंधू सत्येंद्रनाथ याना त्या दोघातील वयाचे अंतर मान्य नव्हते. त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव नाकारला.

पण जरी अनाशी विवाह होऊ शकला नाही तरी तिने म्हणजेच नलिनीने टागोरांचे भावविश्व शेवटपर्यंत व्यापले होते. तिची स्मृती त्यांच्या मनात शेवटपर्यंत जागृत होती. त्या दोघांच्या एकमेकांवरील असलेल्या प्रेमातून रवींद्रनाथांच्या अनेक अक्षर कवितांचा जन्म झाला आहे.

पुढे रवींद्रनाथ इंग्लंडला गेल्यावर स्कॉट कुटुंबात राहिले. स्कॉट पती पत्नी आणि त्यांच्या दोन मुली असे हे चौकोनी कुटुंब होते. स्कॉट कुटुंब अतिशय प्रेमळ होते. स्कॉटबाईंनी टागोरांना खूप जीव लावला. त्यांच्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले. भारतीय स्त्रीचेच आपल्या कुटुंबावर, पतीवर प्रेम असते हा रवींद्रनाथांचा गैरसमज या कुटुंबात राहिल्याने दूर झाला. आई, मग ती भारतीय असो वा पाश्चिमात्य, तिचे आपल्या मुलांवर सारखेच प्रेम असते या विश्वभावनेचा प्रत्यय त्यांना या कुटुंबात राहिल्याने आला. टागोरांच्या पुढील आयुष्यात त्यांच्यामधील संगीतकारात जो भारतीय आणि पाश्चात्य संगीताचा संगम दिसतो त्याचे मूळ ते या कुटुंबात राहिले होते इथे आहे. स्कॉट यांच्या दोन्ही मुली संगीतात प्रवीण होत्या. त्यांनी रवींद्रनाथांना पाश्चात्य संगीत शिकवले.

ते असे या कुटुंबात रमले असतानाच, त्यांना त्यांच्या कुटुंबियांकडून भारतात परत येण्याबद्दल सांगितले गेले. या वेळी रवींद्रनाथांना निरोप देताना स्कॉट बाईंना आपले अश्रू आवरता आले नाहीत. त्यावेळी त्या म्हणाल्या, ' एवढा जीव लावून लगेच जायचे होते, तर आलासच कशाला ?' या प्रसंगातून रवींद्रनाथांना स्त्री हृदयातील प्रेमाची, वात्सल्याची अनुभूती आली. आणि एका परीने त्यांचे भावविश्व संपन्न होण्यास मदत झाली.

**- विश्वास देशपांडे, चाळीसगाव.**

# मतदानासाठी लंडनहून थेट बारामतीला

बारामती, दि. ७ (प्रतिनिधी) - केवळ राज्याचेच नव्हे तर देशाचे लक्ष लागलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीमध्ये मतदानाचा पवित्र हक्क बजाविण्यासाठी साहिल बोराटे हा युवक थेट लंडनहून मंगळवारी बारामतीमध्ये पोहोचला. मतदान केल्यानंतर मंगळवारी रात्रीच तो लंडनला परतणार आहे. 'लोकशाहीमध्ये प्रत्येकाचेच मत महत्वाचे आहे. सर्वांचा सहभाग हाच लोकशाहीचा खरा भक्कम पाया आहे. प्रत्येक मतदारांने मतदान करणे हे आपले परम कर्तव्य आहे आणि हे लोकशाहीनेच दिलेला आपला अधिकार बजावण्यासाठी मी लंडनहून आलो असल्याचे साहिल याने सांगितले.

'मतदान हे लोकशाहीसाठीच' या ब्रीदवाक्यानुसार साहिल संजीव बोराटे (रा. शिर्सूफळ, ता. बारामती) हा युवक बारामती येथे मंगळवारी मतदान केंद्रावर पोहोचला. तो युनिव्हर्सिटी ऑफ लिव्हरपूल येथे 'मास्टर इन ऑपरेशन अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट' हा अभ्यासक्रम करीत आहे. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या चुरशीच्या लढतीमध्ये आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान करून रात्रीच पुन्हा लंडनला जाण्यासाठी रवाना होणार असल्याचे साहिलचे वडील संजीव बोराटे यांनी सांगितले.

# केजरीवाल यांना दिलासा नाहीच! २० मे पर्यंत कोठडीत वाढ

नवी दिल्ली, दि ७ (प्रतिनिधी) - दिल्लीतल्या मद्य धोरण घोटाळ्यात आरोप असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी संपत नसल्याचे चित्र आहे. ईडीने मनी लॉन्ड्रिंगच्या आरोपाखाली २१ मार्च रोजी अरविंद केजरीवाल यांना अटक केली. महिना उलटून गेल्यानंतरही केजरीवाल यांची कोठडीतून सुटका झालेली नाही. याउलट त्यांच्या कोठडीत वाढ झाली आहे, सुप्रीम कोर्टाची सुनावणी पुढे ढकलल्यामुळे केजरीवाल यांच्या कोठडीमध्ये २० मे पर्यंत वाढ करण्यात आली आहे.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अंतरिम जामीन देण्याप्रकरणी आज सुप्रीम कोर्टामध्ये सुनावणी झाली. यावेळी कोर्टाने अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर करण्यास नकार दिला. सुप्रीम कोर्टाने यावेळी सुनावणीदरम्यान म्हटलं होतं की की, 'केजरीवाल हे सध्या दिल्लीचे मुख्यमंत्री आहेत. तसेच त्यांना लोकसभा निवडणुकीसाठी प्रचार देखील करायचा आहे. ही असामान्य स्थिती आहे. तसेच केजरीवाल हे काही वारंवार अपराध करणारे व्यक्ती नाहीत.' न्यायमूर्ती संजिव खन्ना आणि न्यायमूर्ती दिपांकर दत्ता यांच्या दोन सदस्यीय खंडपीठाने यासंदर्भात सुनावणी घेतली.

केजरीवाल यांना जामीन मंजूर करण्यास ईडीने विरोध दर्शवला होता. यामुळे चुकीचा पायंडा पडेल. तसेच एक सामान्य व्यक्ती आणि एका पदावरील व्यक्तीमध्ये असा भेदभाव करणे योग्य नाही. शेतकऱ्याला शेतात धान्य पेरायचं म्हणून त्याला जामीन मंजूर केला जाईल का, अशा प्रकारचा युक्तीवाद ईडीच्या वकिलांनी कोर्टामध्ये केला होता. सुप्रीम कोर्टाने यावर म्हटलं होतं की, 'लोकसभा निवडणुका या दर पाच वर्षांनी होतात. चार किंवा सहा महिन्यांनी शेतातील पेरणीसारखी ही घटना नाही. ही असामान्य स्थिती आहे. आम्हाला याप्रकरणी केजरीवाल यांना अंतरिम जामीन देण्यासाठी प्राधान्याने विचार करावा लागेल.' कोर्टाने सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर आपला निर्णय अडीच वाजेपर्यंत राखून ठेवला होता.

केजरीवाल यांना अंतरिम जामीन मिळण्याची शक्यता होती. पण, तसं होऊ शकलेलं नाही. त्यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्यात आली आहे.

२० मेपर्यंत केजरीवाल कोठडीतच असणार आहेत. त्यामुळे हा आपसाठी मोठा धक्का आहे.

## 'एडका' हे साहित्याच्या सर्व कसोट्या पूर्ण करणारे प्रांजळ आत्मचरित्र : श्रीमती विनया खडपेकर



पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या प्रकाशन सोहळ्यात, संस्कृती प्रकाशन, ठाणे यांनी प्रकाशित केलेल्या डॉ. मुरहरी केळे यांच्या 'एडका' या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी साहित्यविश्वातील मान्यवरांची उपस्थिती होती, ज्यांनी 'एडका' ही एक उत्कृष्ट साहित्यकृती म्हणून गौरवले.

श्रीमती खडपेकर यांनी 'एडका'च्या अपवादात्मक साहित्यिक मूल्यावर भर दिला आणि असे प्रतिपादन केले की, कोणतेही चरित्र आत्मचरित्र जर साहित्यिक मूल्याच्या कसोट्यावर तपासून पाहिले तर डॉ. मुरहरी केळे यांचे एडका हे आत्मचरित्र सर्व कसोट्यावर उत्तम ठरले आहे. त्यांनी डॉ. केळे यांचे जीवनातील संघर्षांचे प्रामाणिक चित्रण केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

'एडका' हे जीवनाच्या सर्व स्तरातील वाचकांना प्रतिध्वनित करणारी आकर्षक कथा बनवते, असेही त्यांनी सांगितले.

महात्मा फुले अध्यासनाचे माजी प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी 'एडका' हे चित्रमय शैलीतील आत्मचरित्र असून त्यातील लालित्यपूर्ण प्रसंग वाचनीयता वाढवते. एडका हा नायक असून ते धनगर संस्कृतीचे प्रतीक आहे. खरेपणा, प्रामाणिकपणा सुद्धा लालीत्यपूर्ण अंगाने लिहिला असून तो अतिशय ओघवत्या भाषेत वाचकांसमोर मांडला आहे.धनगर संस्कृतीचे चित्रण, लवचिकता आणि सामर्थ्याचे प्रतीक म्हणून कार्य करणाऱ्या एडका या शीर्षकाचे कौतुक केले. आत्मचरित्रातील सत्यता आणि लालित्य अधोरेखित करण्यासाठी त्यांनी संत एकनाथ महाराजांच्या भारुडातील 'एडका मदन तो केवळ पंचानन' चा संदर्भ दिला.

९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.डॉ. रवींद्र शोभणे यांनी अठरापगड जाती आणि बारा बलुतेदारांच्या संघर्षावर आणि त्यांच्या विजयावर प्रकाश टाकणारा 'एडका' हा एक महत्त्वपूर्ण सामाजिक दस्तऐवज असल्याचे सांगितले.

प्रा. वसुंधरा काशीकर यांनी आत्मचरित्रात चित्रित केलेल्या काही मार्मिक घटनांचा उल्लेख करून 'एडका' ची भावनिक खोली अधोरेखित केली. त्यांनी एडका या आत्मचरित्रातील दोन प्रसंग फुलवून सांगितले आणि या आत्मचरित्रात अशा अनेक हृदयद्रावक प्रसंगाची मालिकाच असल्याचे प्रतिपादन केले.

या आत्मचरित्राचे लेखक डॉ. मुरहरी केळे यांनी कृतज्ञता व्यक्त केली आणि 'एडका' च्या आत्मचरित्रात्मक प्रवासाबद्दल अंतर्दृष्टी शेअर केली, आपले प्रास्ताविक मनोगत व्यक्त करताना एडका ही संघर्षमय यशोगाथा असून यात सुख- दुःख,मान- अपमान, यश-अपयश अतिशय प्रामाणिकपणे लिहिण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले. मी जसे,जसे जगत आलो तसे,तसे लिहत आलो असल्याची भावना प्रांजळपणे डॉ. मुरहरी केळे यांनी व्यक्त केली.

सौ. असावरी देशपांडे जोशी यांनी अतिशय उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. तर संस्कृती प्रकाशन ठाणे यांच्या प्रमुख सौ. मनीषा केळे यांनी कार्यक्रमाचे अतिशय नेटके आयोजन केले.

कार्यक्रमास कवी मंगेश काळे, निर्मोही फडके, पुरोगामी प्रकाशनचे चाँद शेख, श्री. सोलनलार, श्री. वाघमोडे यांसारख्या मान्यवर व्यक्तींसह असंख्य साहित्य रसिकांनी हजेरी लावली होती, ज्यांनी मानवी अनुभवाचे सार टिपणारी साहित्यकृती म्हणून डॉ. केळे यांच्या 'एडका' या साहित्यकृतीचे कौतुक केले.

## वर्षाला ८१ लाख रुपये पगार, तरीही मोफत अन्नावर मारायचा ताव; व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नोकरी गमावली

**भारतात मोफत आणि रास्त दरात मिळणाऱ्या अन्नधान्यावर सधन कुटुंबेही ताव मारताना दिसतात. भारतात ही बाब साधारण असली तरी परदेशात ही बाब गंभीरतेने घेतली जाते. कॅनडाच्या टीडी बँकेत काम करणाऱ्या भारतीय वंशाच्या एका डेटा सायंटिस्टला अशाच मोफत अन्नधान्यावर हात मारल्यामुळे आपली नोकरी गमवावी लागली आहे.**

कॅनडामध्ये विद्यार्थी, बेरोजगार आणि गरीबांना फुड बँकेतून मोफत अन्नधान्य दिले जाते. मेहुल प्रजापती नामक डेटा सायंटिस्टने विद्यार्थी असल्याचा बनवा करून या फुड बँकेतून मोफत अन्नधान्य तर घेतलेच, शिवाय त्याचा व्लॉगही तयार केला. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले आहे.

मेहुल प्रजापती आपल्या व्हिडिओत फुड बँकेतून मोफत अन्नधान्य कसे मिळवावे, याची युक्ती सांगताना दिसत आहे. मेहुलला नोकरीतून वर्षाला ९८ हजार डॉलरचे उत्पन्न मिळते. तरीही तो फुड बँकेतून अन्नपदार्थ घेऊन शेकडो डॉलर कसा वाचवतो, हे तो अभिमानाने या व्हिडिओ सांगत आहे. प्रत्यक्ष फुड बँकेचाही व्हिडिओ त्याने काढला आहे. फुड बँकेत फळे, भाज्या, पास्ता पासून ते इतर अनेक पदार्थ मिळत असल्याचेही त्याच्या व्हिडिओत दिसत आहे.

मेहुल प्रजापतीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्याच्यावर अनेकांनी टीका केली आहे. कॅनडामधील फुड बँक ही वंचितांना आणि गरजूंना मदत करण्यासाठी कार्यरत आहे. मात्र ज्यांना गल्लेलठ्ठ पगार आहे. त्यांनी या मोफत अन्नपदार्थांवर डल्ला मारणे योग्य नाही, अशी ओरड अनेकांनी केली.

'एक्स'वर एका युजरने लिहिले, 'या माणसाला वर्षाला ९८ हजार डॉलर पगार आहे. तरीही त्याने मोठ्या अभिमानाने मोफत अन्नपदार्थावर ताव मारून त्याचा व्हिडिओ पोस्ट केला आहे.' या कॅप्शनसह सदर युजरने टीडी बँकेच्या हँडललाही टॅग केले. या पोस्टनंतर टीडी बँकेने याची गंभीर दखल घेत मेहुल प्रजापतीवर कारवाई केली. तसेच ज्या युजरने सदर पोस्ट केली होती, त्यालाही कंपनीने उत्तर दिले. तुम्ही आमच्या निदर्शनास जी बाब आणून दिली, त्याबद्दल आपले आभार. आम्ही सदर कर्मचाऱ्यावर कारवाई केली असून त्याला कामावरून कमी केले आहे, असे उत्तर कंपनीकडून देण्यात आले.

## इलेक्ट्रिक बस प्रवासाचे स्वप्न २०२५ मध्येच पूर्ण होणार



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) –छत्रपती संभाजीनगर शहरातील नागरिकांना अद्ययावत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या अंतर्गत महानगरपालिका प्रशासन प्रयत्न करत आहे. यासोबतच प्रदूषण होऊ नये यासाठीदेखील प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. याच पार्श्वभूमीवर शहरात ३५ इलेक्ट्रिक बस (ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट) भाडेतत्त्वावर मनपा चालवणार आहे.

पीएमईअंतर्गतदेखील १०० बस मिळणार आहेत. मात्र इलेकट्रिक बसचा २०२३ चा मुहूर्त हुकला असून २०२४ मध्येदेखील बस येण्याच्या शक्यता धूसर झाली आहे. चार्जिंग स्टेशनसाठी हायपरटेन्शन लाइन टाकण्यासाठी वेळ जाणार आहे. नवीन बस दाखल होण्यासाठी २०२५ उजाडणार असल्याचे बोलले जात आहे.

स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या अंतर्गत शहरात १०० बस धावत आहेत. दररोज या बसच्या माध्यमातून २५ हजारपेक्षा जास्त प्रवासी प्रवास करत आहेत. मात्र असे असले तरी शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे ही सार्वजनिक वाहतूक सेवा अपुरी पडत आहे. त्यामुळे स्मार्ट सिटीने हैदराबाद येथील ओलेक्ट्रा ग्रीनटेक या कंपनीशी करार केला आहे. यामध्ये ५९ रुपये प्रतिकिलोमीटरप्रमाणे सदरील कंत्राटदाराला पैसे देण्यात येणार आहे. प्रशासनाकडून २३० किलोमीटरची हमी घेण्यात आली आहे. त्याच्यावर बस चालल्यास सदरील कंत्राटदाराला ५० टक्के रक्कम दिली जाणार आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम ही स्मार्ट सिटी प्रशासनाला राहणार आहे. जाधववाडी येथे चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक सुविधा स्मार्ट सिटी प्रशासनाकडून उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या डेपोचे काम अंतिम टप्यात असले तरी महावितरणकडून चार्जिंग स्टेशन साठी घेण्यात आलेली जुनी परवानगी रद्द झाली. नव्याने १३५ चार्जसाठीच्या लाइनसाठी फेब्रुवारी २०२४ मध्ये प्रस्ताव सादर केला आहे. मात्र त्यात त्रुटी काढण्यात आल्याने हा प्रस्तावाला मंजुरीची प्रतीक्षा आहे.

## सरला बेट गोदाधामचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांची शिवमहापुराण कथेला भेट



वैजापूर, दि. ७ (प्रतिनिधी) – येथे सुरू असलेल्या शिवमहापूराण कथेला सरला बेट गोदाधामचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांनी भेट देऊन शिव भक्तांना संबोधित करताना विशद केले की,भोळ्या शंकराची मनोभावे भक्ती केल्यास, भक्तांच्या व्यथा व समस्याचे निराकरण होण्यास वेळ लागत नाही. हभप समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून जे भक्त महाशिवपुराण कथा ऐकतात ते भक्त भाग्यवंत होत असेही रामगिरी पुढे म्हणाले, या प्रसंगी साई माऊलीचे महेंद्र काटकर, राम उचित, धोंडीरामसिंह राजपूत, मनोज गायकवाड, श्याम उचित, मेऊल पोकरणे यानी रामगिरी महाराज यांचे पूजन केले. त्यांच्या समवेत मधू महाराज, चंद्रकांत महाराज व रामभाऊ महाराज यांचेही पूजन करण्यात आले.

## सलमान खानच्या घरावर गोळीबार प्रकरणात पाचव्या आरोपीला अटक!

मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी) – अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार प्रकरणात मोठमोठे खुलासे होत आहेत. या प्रकरणात मुंबई पोलिसांचा वेगाने तापास सुरु असून आता पाचव्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेने मोहम्मद चौधरी नावाच्या आरोपीला राजस्थानवरुन अटक केली आहे. गोळीबार करणाऱ्यांना लॉजिस्टिक्स मदत केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. गुन्हे शाखेचे पथक आरोपीला घेऊन मुंबईत आले आहेत. मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने सांगितले की, आरोपी मोहम्मद चौधरीने सागर पाल आणि विक्की गुप्ता या दोघांनाही पैसे पुरवण्यात आणि रेकी करण्यात मदत केली. मोहम्मद चौधरीला आज मुंबईत आणण्यात आले असून त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे. शिवाय कोठडीची मागणी करण्यात येणार आहे. सलमान खानच्या घराजवळ १४ एप्रिल रोजी गोळीबार करण्यात आला. मुंबई पोलिसांनी या प्रकरणी अत्यंत वेगाने हालचाली करत आरोपींना ताब्यात घेतले. दरम्यान, यातील एका आरोपीने अनुज थापनने १ मे रोजी तुरुंगात आत्महत्या केली. सध्या या प्रकरणाचा आणखी तपास सुरु आहे. मोहम्मद चौधरीकडून आणखी काय खुलासे होणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## धक्कादायक; घरात घुसून तरुणीचा विनयभंग

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – तरुणीच्या घरात घुसून त्याने तिच्याशी गैरवर्तन केले. त्याला जमावाने बेदम चोपले. हा प्रकार ६ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजता सातारा गावात घडला. तरुणाविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहितीनुसार, २० वर्षीय पीडिता कल्पना (नाव काल्पनिक) कुटुंबीयांसह सातारा गावात राहते. ती मार्च २०२३ पासून एका दुचाकी गाड्यांच्या शोरूममध्ये काम करत होती. तेथे आरोपी आदिलही कामाला होता. तेथे त्यांची ओळख झाली होती.

तेव्हापासून तो कल्पनाशी बोलण्याचा प्रयत्न करायचा. हा प्रकार कल्पनाला खटकला. त्यामुळे तिने फेब्रुवारी २०२४ मध्ये ते काम सोडले.

तेव्हापासून ती घरीच असते. दरम्यान, आदिल हा कल्पनाशी संपर्क करण्याचा प्रयत्न करीत होता. त्यामुळे कल्पनाच्या भावाने त्याला समजावले होते.

तरीही ६ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजता कल्पना घरात एकटी असताना आदिल तिच्या घरी गेला. त्याने दरवाजाची कडी वाजविली. दार उघडताच तो घरात घुसला आणि आतून कडी लावून घेतली. पीडिता जोरात ओरडल्यामुळे त्याने तिचे तोंड दाबले. तेवढ्यात शेजारचे नातेवाईक मदतीला धावले. त्यांनी आदिलला तेथेच बेदम चोप दिला. त्यानंतर हा प्रकार सातारा पोलिसांना कळविला.

## बदलत्या हवामानाचा परिणाम; राज्यात फक्त २८ टक्के जलसाठा;पाणीटंचाईचे संकट भिषण

**उन्हाचो** चटके चोहोबाजूंनी जाणवू लागले असतानाच राज्यात लघु,मध्यम व मोठ्या प्रकल्पात एप्रिलमध्ये ३८ टक्के जलसाठा होता आणि आता आणखी कमी होऊन केवळ २८ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक रहाला आहे.यामुळे पाणी टंचाईच्या झळा सर्वत्रच जाणवू लागल्याने राज्यातील २ हजार ३४४ गावात आणि ५ हजार ६०५ वाड्यांवर टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.यामुळे यावर्षी पाणीप्रश्न अत्यंत गंभीर होण्याचा धोका व्यक्त होत आहे.येत्या काळात उन्हाचा पारा वाढल्याने पाण्याची भिषण टंचाई निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.राज्यात मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी टँकरची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.सध्याच्या परीस्थितीत राज्यातील धरणांची स्थिती अत्यंत गंभीर आहे अमरावती ४३.८४ टक्के,कोकण ४२.१२टक्के, नागपूर ४०.४३टक्के,नाशिक ३०.६५ टक्के, पुणे २३.६९ टक्के, मराठवाडा १३.४० टक्के, संभाजीनगर ११.८९ टक्के यावरून स्पष्ट होते की पाण्याच्या बाबतीत संभाजीनगर ,मराठवाडा व पुणे अत्यंत चिंताजनक स्थितीत असल्याने तीव्रपाणी टंचाई दिसून येते.कारण राज्यातील २ हजार ९९४ प्रकल्पांची एकुण क्षमता ४० हजार ४८५ दशलक्ष घनमीटर आहे.सध्या या प्रकल्पामध्ये फक्त १५ हजार १८९ दशलक्ष घनमीटर पाणी साठा उरला आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पाण्याची समस्या आणखीनच बिकट होण्याची शक्यता दिसत आहे.सध्या राज्यातील १८ ते २० धरणे कोरडी पडली आहेत.त्यामुळे येत्या काळात राज्याला तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याचे चिन्ह जवळपास निश्चित आहे.यावर्षी बदलत्या हवामानामुळे नेहमीपेक्षा कमी पाऊस झाल्याने उष्णतेच्या लाटे सोबतच पाण्याच्याही हाहाःकाराला आतापासूनच सुरूवात झाली आहे.दरवर्षी पावसाची कृपादृष्टी असणारा पश्चिम महाराष्ट्र यंदा पाण्यासाठी तडफतो आहे. त्यामुळे आतापासूनच टँकरग्रस्त झाला आहे.पुणे विभागातील कोल्हापूर जिल्हा वगळता पुणे, सातारा, सांगली, आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील विहिरींनी तळ गाठला आहे. यामुळे ३३४ गावातील ६ लाख ७२ हजार ८०७ नागरिकांना ३६४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण महाराष्ट्रात पाण्याची टंचाई भेडसावणार आहे. याचे प्रायचित्य मानव, पशुपक्षी, संपूर्ण जीवजंतू,जंगल संपदा यांना आतापासूनच भोगावे लागत आहे.अजुन पावसाळ्याला दोन महिने बाकी आहे.राज्यासह देशातील जलाशय साठा निम्म्यावर आलेला आहे तर दुसरीकडे सुर्य आग ओकत आहे म्हणजेच पाण्याची समस्या आणि सुर्याचे आक्राळविक्राळ रूप आणि जलसाठा कमी होने यामध्ये पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला यावर्षी अत्यंत कठीणायीचा सामना करावा लागण्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. महाराष्ट्रासह देशातील बदलत्या हवामानामुळे सर्वत्र उष्णतेची लाट तर कधी अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे संपूर्ण जीवसृष्टी मानव, पशुपक्षी यांचे जीवन विस्कळीत होतांना दिसते तर दुसरीकडे वाढत्या तापमानामुळे पाण्याची समस्या दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसत आहे.विदर्भात नागपूर, यवतमाळ, अकोला, चंद्रपूर येथे उष्णतेची लाट कायम आहे तर मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर येथे उकाडा वाढला आहे.म्हणजेच सुर्याने आपले उग्र रूप कळत न कळत सर्वत्र पसरविले आहे.त्यामुळे हवामान खात्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या बाबतीत एलो अलर्ट घोषित केले आहे.अकोला ४४.३० अंश सेल्सिअस, सोलापुरचे तापमान ४३.१ अंश सेल्सिअस, चंद्रपूर ४०.८ अंश सेल्सिअस, वाशिम ४३ अंश सेल्सिअस, यवतमाळ ४२.२ अंश सेल्सिअस, नागपूर ४१.५ विदर्भातील सरासरी तापमान ४२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसची नोंद झाली.यावरून स्पष्ट होते की दिवसा तर उकाडा वाढलाच परंतु रात्रीही उकाड्याचे चटके संपूर्ण महाराष्ट्राला सहन करावे लागत आहे.हवामान खात्याने असेही वर्तविले आहे की मे ते जून महिन्यात देशातील अनेक भागातील उन्हाची झळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येणारे दोन महिने सर्वांनीच आपापली काळजी घेणे गरजेचे आहे.राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात सुर्य आग ओकतांना दिसतो आणि हा संपूर्ण प्रकार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेला आहे.गंगेच्या खोऱ्यातील पश्चिम बंगाल,पूर्व झारखंड, उत्तर ओडिशा आणि रायलसीमा येथे कमाल तापमान ४४ ते ४७ अंश सेल्सिअसच्या आसपास रहाण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविला आहे.यावर्षी वेळेच्या आधीच सुर्याने आक्राळ – विक्राळ रूप धारण केल्याचे दिसून येते आणि पुढे आणखी भयानक स्थिती निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.कारण आतापासुनच नदी, तलाव, विहिरी, धरणे यांच्या पाण्याची पातळी कमी कमी होत आहे आणि ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळेल.आतापासुनच महाराष्ट्रात तापमानाचा पारा सिमापार करून पुढील काही दिवसांत कठीण परिस्थितीत निर्माण करण्याची भीती वर्तवली जात आहे.कारण मानवाने केलेला निसर्गाचा ह्रास यामुळेच आज आपल्याला उन्हाचे चटके व पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. त्याचप्रमाणे मानवाने केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मानव तर भोगतच आहे सोबतच पशुपक्षी, संपूर्ण जीवसृष्टी, पृथ्वी, आकाश-पाताळ,नदी-नाले,तलाव, धरणे, विहिरी यांनाही भोगावे लागत आहे.कारण राज्यासह देशातील वाढते तापमान हे दिवसेंदिवस निसर्गावर सरळ प्रहार करीत असुन संपूर्ण निसर्गाचे संतुलन ढासळत आहे त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे नागरिकांनी वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे गरजेचे आहे.बदलत्या हवामानामुळे यावर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे आतापासूनच राज्यातील अनेक भागात आपल्याला भिषण पाणी टंचाई दिसून येत आहे.जलाशयामध्ये फक्त २८ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते.म्हणजे एकीकडे तापमानात वाढ यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम,तर दुसरीकडे पाणी टंचाई अशा डबल गंभीर समस्यांशी आपणा सर्वांना झुंज द्यावी लागणार आहे.वाढत्या तापमानामुळे उष्णतेची व अवकाळी पावसाचे बादल महाराष्ट्रासह अनेक राज्यात दिसून येते.राज्यात वाढते तापमान पहाता आरोग्य विभागाने उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन सुध्दा केले आहे.वाढत्या उष्णतामानामुळे उन्हात फिरल्याने डोके दुखी,ताप येणे, जास्त घाम येणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडने अशा पध्दतीची साधारणतः उष्माघाताची लक्षणे जानवु शकतात.यावर प्रार्थमिक उपाय म्हणून स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.सावलीचा सहारा घेणे, थंड पेय घेणे,नारळाचे पाणी पिने, पाणी भरपूर पिने साधारणतः बाहेर निघताना कॉटनचे सैल कपडे घालावेत आणि जास्तच अस्वस्थ वाटत असेल डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.परंतु आज वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे त्यांच्यासाठी आपापल्या पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली पाहिजे व पशुपक्षांना वाढत्या तापमानापासुन दिलासा दिला पाहिजे.बदलते हवामान, पाणी साठा कमी होने,अती उष्णता, अवकाळी पाऊस याला रोखण्यासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येईल व निसर्ग प्रफुल्लित राहील.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**


सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

**: संपादक :**

**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in



या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# श्यामसुंदर मुंदडांनी घरच्या घरी बजावला आपला मतदानाचा हक्क

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- येथील अहिंसा नगरातील (विधान सभा क्षेत्र १०९- औरंगाबाद पूर्व) रहिवासी श्यामसुंदर मुंदडा या ८५ वर्षे वयाच्या दिव्यांग व्यक्तिने आज आपला मतदानाचा हक्क घरी बजावला. निवडणूक यंत्रणेतील अधिकारी- कर्मचारी यांनी घरी जाऊन त्यांचे मत नोंदवून घेतले.

लोकसभा निवडणूक अंतर्गत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशाने ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांना त्यांच्या मागणीनुसार घरीच मतदान करण्याची सुविधा देण्यात येत आहे. १९-औरंगाबाद मतदारसंघात निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली उपलब्ध करून देण्यात आली. आज गृह मतदानाच्या पहिल्या दिवशी मतदारसंघात घरी जाऊन दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांचे मतदान घेण्यात आले. शहरातील अहिंसा नगर येथील शामसुंदर मुंदडा या ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदार यांनी निवडणूक कर्मचाऱ्यांकडे फॉर्म १३ डी भरून दिला होता. त्यानुसार त्यांची घरी मतदान करण्याची मागणी नोंदविण्यात आली. त्यानुसार त्यांचे मतदान घरीच करून घेण्यासाठी निवडणूक विभागाने आज मतदान प्रक्रिया पार पाडली.

**अधिकारी-कर्मचाऱ्यांचे पथक पोहोचले घरी**

अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी लिगदे, मतदान अधिकारी -१आर व्ही कोलते, मतदान अधिकारी -२ धनश्री वाघ ,एस टी लोखंडे,



अश्विनी सोनार, पोलीस कर्मचारी मोहिनी मोहरे हे मुंदडा यांच्या घरी पोहोचले. त्यांना सर्व माहिती करुन दिली. त्यानंतर त्यांचे मतदान गोपनीय असावे यासाठी बुथ तयार करुन त्यांचे मतदान नोंदविण्यात आले. त्यांच्या बोटाला शाई लावण्यात आली.

**मतदानाचा हक्क बजावल्याचे समाधान- श्यामसुंदर मुंदडा**

मतदान केल्यानंतर शामसुंदर मुंदडा यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले की 'मी दिव्यांग आहे. मला चालता येत नाही. त्यात वय जास्त असल्यामुळे मला घराच्या बाहेर येऊन मतदान करणं अवघड होतं. म्हणून मी माझ्या इच्छेने घरूनच मतदान करण्याच्या पर्यायाची मागणी केली. त्यानुसार मला ही गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आणि आज मी घरीच मतदान केले. या सुविधेमुळे मला मतदानाचा हक्क बजावण्याचे समाधान आणि आनंद आहे. यामुळे मी निवडणूक आयोगाचे आणि आपल्या सर्व निवडणूक प्रक्रियेतील अधिकारी- कर्मचारी यांचे आभार मानतो.

आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ दिव्यांग व्यक्तिस मतदानाचा हक्क बजावता आला याचा आनंद आणि समाधान त्यांच्या कुटुंबियांच्या चेहऱ्यावर दिसले. घरीच मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे त्रास न होता मतदानाचा हक्क बजावता आला. मतदान सहज सुलभ आणि आनंदात करता आलं, याचे समाधान मुंदडा कुटुंबातील अन्य सदस्यांनी व्यक्त केले.

एकही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करीत असून गरज आहे आता फक्त मतदारांनी स्वयंप्रेरणेने मतदानाचा हक्क बजावण्याची.

# ईव्हीएम हॅक करून देतो; अंबादास दानवेंना ऑफर देणाऱ्यास सापळा रचून पोलिसांच्या ताब्यात

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- ईव्हीएम मशीनला विशिष्ट प्रकारची चिप बसवुन उमेदवारास जास्त मतदान करून देण्याच्या बहाण्याने अडीच कोटी रूपयांची मागणी करून फसवणूक करणाऱ्यास आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.



यासंदर्भात आज दि.७ रोजी अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद यांनी पोलीस आयुक्त यांना दिलेल्या लेखी तक्रारीनुसार, त्यांचे मोबाईलवर मारोती ढाकणे असे नांव सांगणाऱ्या इसमाने मतदान केंद्रात निवडणुकीत वापरण्यात येणाऱ्या ई व्ही एम मशीनला माझ्याकडील विशिष्ट प्रकारची चीप बसवुन तुमच्या उमेदवारास जास्तीत जास्त मतदान करून देतो असा बहाणा करून त्या मोबदल्यात मला अडीच कोटी रूपये द्यावे लागतील, असे सांगितले. या प्रकरणाचे गांभीय लक्षात घेवुन पोलीस आयुक्त मनोज लोहिया यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक संभाजी पवार, आर्थिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात विशेष पथक नेमून हे पथक राजेंद्र दानवे यांचे सोबत रवाना केले.

आज दुपारी चार वाजेच्या सुमारास सदर इसम मारोती ढाकणे यांने राजेंद्र दानवे यांना मध्यवर्ती बस स्थानक समोरील हॉटेल न्यू मॉडर्न टि हाऊस स्विट ॲण्ड स्नॅक्स, छत्रपती संभाजीनगर येथे बोलविले होते. या ठिकाणी राजेंद्र दानवे, साध्या गणवेषातील पोलीस पथक व पंच असे सापळा लावुन थांबलेले असतांना मारूती ढाकणे हा त्या ठिकाणी आला. त्याने राजेंद्र दानवे यांना सांगितले कि, माझ्याकडे एक विशिष्ट प्रकारची चीप असुन दिनांक १३/०५/२०२४ रोजी मतदानाच्या दिवशी विशिष्ट प्रकारची चिप मतदान केंद्रामध्ये जावुन ईव्हीएम मशीनला बसविण्याची व्यवस्था करतो. त्यामुळे फक्त तुमच्याच उमेदवारास जास्तीत जास्त मतदान मिळेल,असे सांगुन मोबाईलवर संभाषणात ठरल्याप्रमाणे अडीच कोटी रूपयांपैकी तडजोडीअंती दीड कोटी रुपयांची मागणी करून आज टोकन रक्कम म्हणुन एक लाख रूपयांची मागणी केली. त्याप्रमाणे राजेंद्र दानवे यांच्याकडुन त्याने एक लाख रुपये स्वीकारतांना पंचासमक्ष सापळा लावुन बसलेल्या साध्या वेशातील पोलीस पथकाने रंगेहाथ पकडले. या इसमाचे त्याचे पुर्ण नाव मारोती नाथा ढाकणे, वय-४२ वर्षे, व्यवसाय- आर्मी हवालदार, उदमपुर, जम्मु, रा. काटेवाडी, पो. खरवंडी कासार, ता. पाथर्डी जि. अहमदनगर असे त्याने सांगितले. या इसमास ताब्यात घेवुन पुढील कायदेशीर कार्यवाहीची प्रक्रिया सुरु आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त मनोज लोहिया, पोलीस उपायुक्त गुन्हे प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त गुन्हे धनंजय पाटील, पोलीस निरीक्षक संभाजी पवार, सहायक पोलीस निरिक्षक ज्ञानेश्वर अवघड, सय्यद मोसिन, पोलीस उपनिरीक्षक अशोक अवचार, पोह विजयानंद गवळी, सचिन शिंदे, भगीनाथ बोडखे, विठ्ठल मानकापे, गणेश शिंदे, परमेश्वर भोकरे, संदीप जाधव, नितीश घोडके आर्थिक गुन्हे शाखा यांनी केली.

### महिला मतदार जनजागृती

# महिलांनो ! मतदानात खारीचा नव्हे सिंहाचा वाटा द्या-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- मतदार यादीत निम्मे मतदार महिला आहेत. महिलांनी मतदानात आपला खारीचा नव्हे तर सिंहाचा वाटा द्यावा. महिलांचे सर्वाधिक मतदान असलेला जिल्हा आणि महिला मतदार ह्या सुजाण नागरिक असल्याची ओळख निर्माण करण्याच्या संधीचे सोने करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.



महिला मतदार जनजागृती उपक्रमाअंतर्गत आज जिल्हा नियोजन सभागृहात आज उच्चशिक्षित व स्वयंसिद्ध महिलांची बैठक बोलावण्यात आली होती. विविध सामाजिक संस्था, उच्च शिक्षित, चार्टर्ड अकाऊंटंट, डॉक्टर्स, वकिल, उद्योजक, अशा विविध क्षेत्रात सक्रिय असलेल्या महिलांना या बैठकीस बोलावण्यात आले होते. स्वीप नोडल अधिकारी सुदर्शन तुपे, सहा, नोडल अधिकारी स्वप्निल सरदार, अंकुश पांढरे आदी अधिकारी तसेच ॲड. शेरखाने, आरजे अर्जना, आयएमएच्या डॉ. रेणू, डॉ. उज्ज्वला झंवर, ॲड. रेणूका घुले, डॉ. सुषमा शिंदे, डॉ. कांचन रोपळेकर आदी विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपण विविध क्षेत्रात नाव लौकीक मिळवलेल्या महिला आहात. आपण तर मतदान करालच. मात्र आपण आपल्या संपर्कातील तसेच आपल्या माध्यमातून इतर महिलांनाही मतदानासाठी प्रेरित करावे. आपली लोकशाही जगात सर्वात मोठी लोकशाही आहे. आपण आपल्या भावी पिढ्यांसाठी त्यांच्या जगण्यासाठी पैसा, मालमत्ता यांची तरतूद करण्यासाठी झटतो. मात्र पुढच्या पिढीला लोकशाहीचे मुक्त वातावरण लाभावे यासाठी आपण काय करतो? त्यासाठीच मतदान करणे आवश्यक आहे. आपल्या एका मताने काय फरक पडेल? असा प्रश्नही काही जण उपस्थित करतात. मात्र एका मतानेच फरक पडतो. मतदानाबाबत उदासिनता ही बाब अत्यंत घातक आहे. ही उदासिनता दूर करण्याचे प्रयत्न आपल्या संपर्कातून आपण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. मतदान करुन आपण सुजाण नागरिक असल्याचे सिद्ध करण्याची संधी आली आहे. आपण महिलांनी मतदानात खारीचा नव्हे तर सिंहाचा वाटा उचलून महिला ह्या सुजाण नागरिक असल्याचे सिद्ध करावे. देशात आपल्या जिल्ह्यात महिलांचे सर्वाधिक मतदान नोंदविले जावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. प्रास्ताविक स्वप्निल सरदार यांनी तर आभारप्रदर्शन अंकुश पांढरे यांनी तर संजीव सोनार यांनी सुत्रसंचालन केले.

# वयोवृद्ध, दिव्यांगांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहन व्यवस्था

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात १३ मे रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी येणे व जाणे दिव्यांग, वयोवृद्ध मतदारांना सोईचे व्हावे यासाठी विनामूल्य वाहन व्यवस्था करण्यात आली आहे. १०९ औरंगाबाद (पूर्व) विधानसभा मतदार संघाचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविल्यानुसार मोहल्ला १) किरादपूरा- राममंदिर, २) शहागंज – हिंदी विद्यालय, ३) नारेगाव पेट्रोलपंप, ४)गारखेडा सुतगिरणी चौक, ५) सिडको एन ६ चौक चिस्तीया कॉलनी रोड या पाच ठिकाणी ही वाहने दि.१३ रोजी सकाळी सात ते सायं. साडेपाच वा. पर्यंत उपलब्ध करण्यात आले आहे. या वाहन सेवेचा लाभ घेण्यासाठी मतदारांनी सक्षम ॲप वर जाऊन वाहना करीता नाव नोंदणी करावयाची आहे. ही नावनोंदणी दि.११ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत करता येणार आहे. तरी मतदारांनी आपली नाव नोंदणी करावी,असे आवाहन सहा. निवडणूक निर्णय अधिकारी १०९- औरंगाबाद (पुर्व) विधानसभा मतदार संघ यांनी केले आहे.

### १०८-औरंगाबाद (पश्चिम) दुसरे प्रशिक्षण

# लोकशाही संवर्धनाच्या कर्तव्यास आत्मविश्वासाने सामोरे जा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १९- औरंगाबाद लोकसभा मतदार संघातील १०८-औरंगाबाद (पश्चिम) विधानसभा क्षेत्रनिहाय मतदान कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण आज पार पडले. वंदे मातरम सभागृहात आज या प्रशिक्षण सत्रास निवडणूक निरीक्षक कांतिलाल दांडे यांनी भेट देऊन पाहणी केली तसेच प्रशिक्षणात सहभागी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शनही केले.





आतापर्यंत घेतलेले प्रशिक्षण, त्यातून मिळालेली माहिती, झालेला अभ्यास यामुळे आपण सर्व निवडणूक प्रक्रिया सुव्यवस्थित पार पडेल असा मला विश्वास आहे. निवडणुकीचे कामकाज हे लोकशाही संवर्धनाचे कर्तव्य असून या कर्तव्यास आत्मविश्वासाने सामोरे जावे,अशा शब्दात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी प्रशिक्षणात सहभागी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले.

येथील वंदेमातरम सभागृहात आज १०८-औरंगाबाद (पश्चिम) विधानसभा क्षेत्राचे प्रशिक्षण आज पार पडले. उमेदवार संख्या वाढल्याने तीन मतदान यंत्रांची आवश्यकता असल्याने तीन यंत्रांची जोडणी या प्रक्रियेचाही प्रशिक्षणात प्रात्यक्षिकासह समावेश करण्यात आला आहे. या प्रशिक्षणात मतदान केंद्र अधिकारी, सहाय्यक अधिकारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात १०८ औरंगाबाद (पश्चिम) या विधानसभा मतदार संघाकडे वर्ग झालेल्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. सकाळच्या सत्रात ५६४ तर दुपारच्या सत्रात १०१८ कर्मचारी सहभागी झाले.

# अधिनस्त कर्मचाऱ्यांचे मतदान झाल्याबाबत खातरजमा करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात दि.१३ रोजी मतदान होणार असून या दिवशी आपापल्या अधिनस्त कर्मचारी अधिकारी यांनी मतदान केले की नाही, याबाबत सर्व अधिकाऱ्यांनी खातरजमा करुन तसा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करावा,असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज निर्गमित केले आहे. सर्व विभागप्रमुखांना दिलेल्या या आदेशात म्हटले आहे की, दि.११ व १२ मे रोजी सुटी आहे व दि.१३ मे रोजी मतदान आहे. त्यामुळे दि. १३ रोजी अधिनस्त कर्मचारी, अधिकारी मुख्यालयी राहण्याबाबत अथवा त्यांचे ज्या ठिकाणी मतदान आहे त्याठिकाणी जाऊन मतदान करण्याबाबत निर्देशीत करावे. दि.१४ रोजी त्यांनी मतदान केले की नाही याची बोटाची शाई तपासून खातरजमा करावी व तसा अहवाल जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयास कळवावा.

(पान १ वरुन)

## बारामतीची लढाई महाराष्ट्राच्या अस्मितेची,...

पराभव केला. पण तसं होणार नाही. बारामतीची लढाई ही महाराष्ट्राच्या अस्मितेची आणि स्वाभिमानाची लढाई आहे. या लढाईत सुप्रिया सुळे विक्रमी मताधिक्याने विजयी होतील. महाराष्ट्रातील अनेक मतदारसंघात भाजप दारुण पराभवाच्या छायेत आहे. भाजपचे अनेक विद्यमान खासदार पुन्हा लोकसभेत दिसणार नाहीत, असा दावा राऊतांनी केला आहे.

याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात अनेक प्रचारसभा घेतल्या आहेत, आता ते मुंबईत येणार असल्याने राऊतांनी यावरून टीका केली आहे. ते म्हणाले, नरेंद्र मोदी यांनी पेडर रोडला आणि अमित शहा यांनी बोरिवलीत घर भाड्याने घेतले आहे. लोकसभा निवडणूक होईपर्यंत त्यांना इथेच राहायचे आहे, त्यांना दुसरे काय काम आहे. पण तुम्ही कितीही खुंट्या ठोका, शिवसेना तुमचा पराभव करणार आहे. मोदींना मुंबईत येऊ द्या. तरीही मुंबईत ठाकरे गटच जास्त जागा जिंकेल, असे राऊत म्हणाले.

## काँग्रेस-भाजप-शिवसेना प्रवास करत...

देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या वतीने भाजपचे हेमंत सावरा यांना पालघर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यानंतर या मतदारसंघातील विद्यमान खासदार राजेंद्र गावित नाराज असल्याची चर्चा रंगली होती. महायुतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रॅलीला देखील राजेंद्र गावित यांनी उपस्थिती लावली नाही. तिकीट कापले गेल्यामुळे गावित यांनी तीव्र नाराजी देखील व्यक्त केली होती.

मात्र, आता त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला असून त्यामुळे महायुतीला पालघर लोकसभा मतदारसंघातील नाराजी दूर करण्यात मोठे यश मिळाले आहे.

# टपाली मतदानाचे मतदान केंद्र जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याव्यतिरिक्त इतर १० लोकसभामतदार संघातील कर्मचाऱ्यांनी ज्यांची नियुक्ती मतदाना संदर्भातील कामकाजासाठी झालेली आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांचे मतपत्रिका पाकीट जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले आहे. तरी या अधिकारी- कर्मचारी यांनी टपाली मतपत्रिका कक्ष येथे सकाळी ९ ते सायं.६ दरम्यान येऊन टपाली मतदान करावे असे आवाहन करण्यात आले हे. तसेच जिल्ह्यात कार्यरत पोलीस अधिकारी कर्मचारी, राज्य राखीव पोलीस दल, होमगार्ड तसेच १८- जालना लोकसभा मतदार संघातील पोलीस अधिकारी कर्मचारी ज्यांची नियुक्ती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आहे त्यांनी फॉर्म नं. १२ भरुन दिलेला असल्यास त्याची अनुज्ञेयता तपासून पात्र ठरलेले अधिकारी- कर्मचारी टपाली मतदान करण्यासाठी टपाली मतपत्रिका कक्षात दि.८ ते दि.१२ या दरम्यान सकाळी ९ ते सायं.६ वा. पर्यंत येऊन आपले मतदान करावे,असे आवाहन करण्यात आले असल्याचे टपाली मतदान नोडल अधिकारी प्रभोदय मुळे यांनी कळविले आहे.

# मतदान केंद्रावर जाण्यासाठी चार हजार 'प्रथमोपचार किट' सज्ज

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- प्रत्येक मतदान केंद्रावर एक प्रथमोपचार किट देण्यात येणार आहेत. जसजशी मतदानाची तारीख जवळ येत आहे तशी प्रशासनाची तयारी सुरु आहे. आज आरोग्य विभागामार्फत द्यावयाच्या चार हजार वैद्यकीय प्रथमोपचार किट सज्ज करुन प्राथमिक आरोग्य केंद्रांवर रवाना करण्यात आल्या, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी दिली.

जिल्ह्यात दि. १३ रोजी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. उन्हाळ्याचा कालावधी लक्षात घेता. निवडणूक प्रक्रियेतील मतदान केंद्रावर कार्यरत कर्मचारी अथवा आलेले मतदार यांच्यापैकी कुणास काही त्रास झाल्यास तातडीने प्रथमोपचार करणे शक्य व्हावे म्हणून प्रथमोपचार किट देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले होते. त्यानुसार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या मार्गदर्शनात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी तसेच जिल्हा शल्य चिकित्सक व आरोग्य यंत्रणेतील अन्य विभागांनी हे प्रथमोपचार किट तयार केले आहे.

**असे असेल प्रथमोचार किट**

हे प्रथमोपचार किट हे एका झिपर पॉलिथीन पाऊच मध्ये देण्यात आले आहे. त्यात पॅरासिटॅमॉल टॅबलेट, ओआरएस पाऊच, ॲन्टासिड टॅबलेट (जेल्युसिल व ऑमेपॅरॉझॉल), सिट्रिझिन, सायक्लोपाम, ॲटीबायोटिक्स, बेटाडीन ट्युब, सर्जिकल कापूस, बॅण्डेज पट्टी, डेटॉल साबण इ. औषधी व प्रथमोचार साहित्य देण्यात आले आहे.

**२३७४ आरोग्य कर्मचारी तैनात**

तसेच प्रत्येक निवडणुक बुथवर पाळणाघराची सुविधा, दिव्यांग मतदारांसाठी व्हिलचेअर्स उपलब्ध असणार आहे. मतदानाच्या दिवशी मतदान प्रक्रियेदरम्यान मतदार व कर्मचारी यांच्या आरोग्याकडे लक्ष ठेवण्यासाठी १९१सामुदाय आरोग्य अधिकारी, ३५०आरोग्य कर्मचारी (महिला व पुरुष ), १८३३आशा स्वयंसेविका असे एकुण २३७४अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी उष्माघात



कक्ष स्थापन करण्यात आले असुन तेथे २४ तास वैद्यकीय अधिकारी व आवश्यक कर्मचारी उपस्थित ठेवण्यात आले आहेत.

मतदारांना मतदान केंद्रावर आवश्यक त्या आरोग्य सेवा मिळणार आहे. त्यामुळे आरोग्याबाबत चिंता न करता निर्भयपणे मतदान करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी विकास मीना व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.